# आरोग्यविषयक समस्या, त्यावरील उपचार कार्यक्रमाचे आयोजन

**अलिबाग (प्रतिनिधी) :** प्रत्येकाचे आरोग्य चांगले राहण्यासाठी अलिबागेत पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर आरोग्यविषयक समस्या व त्यावरील उपचार याबाबत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दि. २४ जानेवारी रोजी सकाळी अकरा ते दुपारी तीन यावेळेत हॉटेल मॅपल आयव्ही येथील सभागृहात हा कार्यक्रम प्रसिध्द तज्ज्ञ चारमेन डिसोजा यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे.



सध्याच्या वेगवान व तणावाच्या जीवनात कुटुंबाशी एकरूप होऊन करिअर आणि सामाजिक संबंध जपले जातात. मात्र, हे करीत असताना प्रत्येकाची तारांबळ उडाली जाते. प्रत्येकाला स्वत:साठी वेळ काढून स्वत:च्या आरोग्याची काळजी घेता येत नाही. त्यामुळे स्वयंपाक घरातील उपचारांचा सहज वापर करून चांगले आरोग्य ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे. लोकांना सकस आहाराने व नैसर्गिकरित्या स्वत:ची काळजी घेऊन आरोग्य जास्त चांगले राखण्यासाठी मदत करण्याचा चारमेन यांचा २५ वर्षाचा अनुभव आहे. त्याच अनुषंगाने अलिबागमधील वेश्वी येथील मॅपल आयव्ही हॉटेलमध्ये आरोग्यविषयक मोफत कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमात सहभाग घेणाऱ्यांचे बायो-ॲनालिसीस करण्यात येणार आहे. यामध्ये चारमेन डिसोजा यांचे प्रास्ताविक व्याख्यान, प्रश्नोत्तरे तसेच आरोग्य तपासणी सुयोग्य उपचार पध्दतीची माहिती कार्यक्रमात दिली जाणार आहे.

चारमेन डिसोजा यांचा आरोग्याविषयी सल्ला योग्य असतो. याचा चांगला अनुभव आपल्यालाही आला असून याचा लाभ अलिबागकरांनी घ्यावा, असे आवाहन चित्रलेखा पाटील यांनी केले आहे.